Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XII Dec. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# चंद्रपूर जिल्यातील पहिल्या महिला आमदार यशोधरादेवी बजाज यांचे राजकीय कार्ये

**दैवत रघुनाथराव बोरकर**
पिएच. डी. संशोधक
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सारांश :—**

चंद्रपूर जिल्हातील विधानसभा निवडणुकीच्या इतिहासात यशोधरादेवी बजाज ह्यांना पहिल्या आमदार होण्याचा मान मिळाला. कोणत्याही प्रकारचे महिला आरक्षण नसतांना, राजकीय वारसा नसतांना, स्व:कतृत्वावर चंद्रपूर नगरपरिषद सदस्य ते महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संसदिय विधी खात्याच्या राज्यमंत्री पर्यंतचा प्रवास हा नक्कीच यशोधरा देवींना सहज नव्हता. यशोधरादेवी बजाज १९७२ ते १९७८ पर्यंत सावली विधानसभा क्षेत्राचे प्रतिनीधित्व केले. त्यानंतर १९८० ते १९८५ पर्यंत चिमुर विधानसभा क्षेत्राचे प्रतिनीधित्व केले. १९८३ ला वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात यशोधरादेवी बजाज राज्यमंत्री झाल्यात. पुरूष वर्चस्वाच्या समाजात एका स्त्रिने राजकीय कर्तृत्वाचा ठसा उमटवला. चंद्रपूर तसेच संपूर्ण महाराष्ट्रात जे अनेक रस्ते, पुल, शासकिय इमारती यांचे बांधकाम झालेत त्याची पायाभरणी यशोधरादेवी यांच्या काळातच झाली. आजही यशोधरादेवींची ओळख त्यांनी केलेल्या कामावरून केली जाते.

**प्रस्तावना :**

चंद्रपूर जिल्हातील बहुतांश भाग जंगलव्याप्त आहे. चंद्रपूर जिल्हाची ओळख मागसलेला भाग म्हणुनच होतो. असे असलेतरी स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा राजकीय सहभाग हा उल्लेखणीय होता. १९२३ चा झेंडा सत्याग्रहापासुन महिलांनी राजकिय सहभाग घेतल्याचा दिसतो. महात्मा गांधीच्या मिठाच्या सत्याग्रहाचे पडसाद येथे सुध्दा उमटले. या क्षेत्रातील महिलांनी मिरवणुक काढुन जनजागृती केली. १९३२ च्या जंगल सत्याग्रहात सुध्दा महिला अग्रस्थानी होत्या. १९४२ चा भारत छोडो या लढ्यात चिमुर क्षेत्रातील सर्वसामान्य घरातील महिलांनी या लढ्यात स्व:खुशीने भाग घेतला. [(१)] भारताच्या स्वातंत्र्य संग्रामच्या इतिहासात १९४२ चे राष्ट्रीय आंदोलनात यशोधरादेवी बजाज यांचा सक्रिय सहभाग होता. [(२)] अशा या ऐतिहासीक प्रदेशाच्या सावली व चिमुर विधानसभेचे प्रतिनिधित्व यशोधरादेवी बजाज ह्यांनी केले.

**यशोधरादेवी बजाज यांचा जिवनवृत्तांत :**

यशोधरादेवी बजाज यांचा जन्म अमरावती जिल्हातील चांदुरबाजार जवळ असलेले विष्णोरा या खेड्यात ९ ऑक्टोबर १९२९ रोजी झाले.[(३)] वयाच्या चौथ्या वर्षी त्यांचे मातृछत्र हरपले. वयाच्या चौदाव्या वर्षी चंद्रपूर येथील भगीरथ बजाज यांच्या सोबत विवाह झाला. महात्मा गांधीनी त्यावेळी 'एकादश व्रता' चे आचरण करावं असं सांगीतले आणि त्यात ब्रम्हाचार्य पालन सुध्दा होते. दोघेही या व्रताचा अवलंब सतत दोन वर्षे करीत राहली. दोन वर्षांनी साध्या तापाचं निमीत्य होउन त्यांच्या पतीचा मृत्यु झाला. भगीरथ भवनात उरले तीन विधवा सासवा आणि यशोधरादेवी तरूण विधवा.[(४)]

अशा परिस्थीतीत जिवन जगण्यासाठी अर्थभार उचलणं गरजेचं होतं. तरूण यशोधरादेवीने हा प्रश्न सोडवला. यशोधरादेवीतएक तेजस्वी स्त्री दडली होती. वाड्याचा काही भाग भाड्याने दिला आणि एक प्रश्न सुटला. तिन सासवांपैकी दोन आपल्या नातेवाईकांकडे गेल्या. घरात उरल्या यशोधरादेवी, त्यांच्या पतिची आई व त्यांच्या दुसऱ्या सासूबाई. एकेदिवशी ह्या महिलांनी एकत्र येऊन सर्वोदय महिला मंडळ स्थापन करण्याचा विचार केला. महात्मा गांधीच्या पुण्यतिथीला या स्त्रियांनी दलित वस्तीत जाऊन ग्रामसफाईचा उपक्रम सुरू केला. हे सार्वजनिक जीवनातील त्यांचे खरेखुरे पदार्पण ठरले. महिलांना स्वावलंबी व मुलांना संस्कारशील करण्याचा प्रयत्न त्यांचा राहिला. [(५)]

**राजकीय प्रवास :**

यशोधरादेवी यांची ओळख सामाजिक कार्य करणाऱ्या महिला नेत्या अशी प्रतिमा तयार झाली. रचनात्मक कार्यातील सरशी राजकीय नेतृत्वासाठी खुणावत असते. चंद्रपूर नगर परिषदेमध्ये १९६१ च्या निवडणूकीत जटपूरा वार्डातुन त्या निवडुन आल्या. १९६२ ते १९६८ पर्यंत त्या नगर कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्ष होत्या. महाराष्ट्राचे लोकनेते दादासाहेब कन्नमवार यांची चंद्रपूर जिल्हातील प्रत्येक राजकीय घटनेवर नजर होती. १९७२ च्या विधासभा क्षेत्रातुन त्यांना कॉंग्रेसची उमेदवारी मिळाली. खुद्द इंदिरा गांधीनी त्यांना चंद्रपूर सोडुन सावलीतून लढण्याचा सल्ला दिला.(६) त्यांना ३७,४८२ मते मिळाले व त्यांना व त्यांच्या विरोधी उमेदवारांना किती मतदान झाले हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**१४५ सावली विधानसभा मतदार संघ**

**१९७२ चा निवडणूक निकाल.**

**एकुण मतदार – ९५,७२३ वैध मते – ६८,११२ झालेले मतदान – ७०,८४५**

| अ. क्र. | उमेदवाराचे नावं | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १ | यशोधरादेवी भगीरथ बजाज | भाराकॉ | ३७,४८२ |
| २ | बालाजी पंत देशकर | भारतीय जनसंघ | १६,८०९ |
| ३ | रामचंद्र बल्लेवार | भाराकॉ (संगठन) | ५,३४० |
| ४ | राघोबाजी गोमाजी गोंगले | रिपाई | ४,९६९ |
| ५ | तलांडे विठ्ठलराव कान्हुजी | अपक्ष | १,८७७ |
| ६ | आत्राम मारोती डोनु | अपक्ष | ९४७ |
| ७ | कडुस्कर देवाजी | अपक्ष | ६८८ |

यशोधरादेवी भगीरथ बजाज (भाराकॉ) विजयीझाल्या(७)

वरिल सावली विधानसभा क्षेत्राच्या निवडणुक निकाल बघता असे लक्षात येते की, यशोधरादेवी बजाज ह्यांना एकूण वैध मतापैकी ५५% मतदान पडले. त्यांच्या नंतर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रतिस्पर्धापेक्षा तब्बल २०,६७३ मते जास्त मिळत बहुमताने विजयी झाल्या.

१९८० च्या विधानसभा निवडणुकीत चिमुर विधानसभा क्षेत्रातुन कॉंग्रेस पक्षाने त्यांना उमेदवारी दिली. १९८० च्या चिमुर विधानसभा क्षेत्राचा निवडणुक निकाल पुढील तक्त्यावरून स्पष्ट होतो.

**१५८ चिमुर विधानसभा मतदारसंघ**

**१९८० चा निवडणुक निकाल**

**एकुण मतदार – १,२६,०१९ वैध मते – ८१,७९१ झालेले मतदान – ८३, ९४५**

| अ. क्र. | उमेदवाराचे नावं | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १ | काळे दामोधर लक्ष्मणराव | अपक्ष | ६,७६ |
| २ | गेडाम हरिभाऊ वातू | भारिप | ८,७६५ |
| ३ | पिसे शंकरराव तुकाराम | अपक्ष | १,४६५ |
| ४ | पोशट्टीवार वसंतराव यादवराव | भाजप | १३,१६८ |
| ५ | बजाज यशोधरा भगीरथ | भाराकॉ (आय) | ४४,२६४ |
| ६ | भाऊराव लक्ष्मणराव दांडेकर | अपक्ष | ७८७ |
| ७ | सोनवणे विठ्ठलराव गोमा | भाराकॉ (अर्स) | १२,६६६ |

बजाज यशोधरादेवी भगीरथ विजयीझाल्या.(८)

वरिल चिमुर विधानसभा निवडणुक निकाल बघता यशोधरादेवी बजाज ह्यांना एकुण वैध मतापैकी ५५% मतदान झाले. त्यांच्या नंतर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारा पेक्षा तब्बल ३१,०९६ मते जास्त मिळत बहुमताने विजयी झाल्यात. सदर दोन्ही निवडणूकीच्या निकालावरून श्रीमती बजाज या स्त्रि असुनही जनमानसात किती लोकप्रिय होत्या हे लक्षात येते.यशोधरादेवी बजाज वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री झाल्या. त्यांना सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संसदीय व विधी कार्यमंत्री हा विभाग त्यांच्याकडे आला. त्यांचा विकासकामातील पुढाकार हा गौरवाचाच राहिला. रस्ते आणि पुलांची निर्मीती करून नागरिकांची काटेरी वाट मोकळी करून दिली. पुढे कॉग्रेस पक्षाने विधानसभेची उमेदवारी दिली नाही परंतु १९९० साली राज्यपाल नियुक्त १२ सदस्यांत त्या विधानपरिषदेच्या आमदार म्हणून १९९६ पर्यंत कार्य केले.[९]

**विधीमंडळात उपस्थित केलेले प्रश्न :**

श्रीमती यशोधरादेवी बजाज यांचा १९७२ साली महाराष्ट्र विधानसभेत प्रवेश झाला. चंद्रपूर गडचिरोली जिल्हातून विधानसभेत प्रवेश करण्याऱ्या त्या पहिल्या महिला आमदार होत्या. यशोधरादेवी यांना कोणतेही क्षेत्र अस्पृश्य नव्हते. जनतेने व्यथा आणावी आणि दुर करून घ्यावी अशी त्यांची ख्याती होती. आमदार असतांना त्यांनी भ्रष्टाचार, अपराध, स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या समस्या, न्यायसंस्थेच्या समस्या, रस्ते, या व इतर सर्व क्षेत्रातील समस्यांचा बारकाईने अभ्यास करून विधिमंडळात त्यांनी प्रश्न मांडले. अनेक प्रश्नांची सोडवणूक यशस्वीपणे त्यांनी केली. महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांबाबत झालेल्या चर्चेत भाग घेतांना त्यांनी मांडलेल्या भावना व विचार वस्तुस्थिती व उध्दीष्ट यांचा मेळ साधणारी होती. यशोधरादेवी यांचे समस्याचे आकलनमुलगामी होते. राज्यपालांच्या अभिभाषणातील चर्चेत सहभाग, अशासकीय विधेयकावरील चर्चेत भाग, अर्थसंकल्पासारख्या महत्वाच्या विषयावर विधीमंडळात भाषणे देऊन त्यांनी आपले कर्तृत्व सिध्द केले. श्रीमती यशोधरादेवी बजाज यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे स्वरूप व्यापक होते. त्यांनी आपल्या मतदार संघापूरता विचार न करता बऱ्याच वेळा राज्यातील समस्यांचा विचार करता अनेक प्रश्न त्यांनी विधिमंडळात उपस्थित केले [१०]

**यशोधरादेवी बजाज याचे दिन – दलित, उपक्षित लोकांकरिता कार्ये :**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची प्रेरणा घेऊन यशोधरादेवी यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरूवात केली. समाजातील दिन–दलित उपेक्षित लोकांसाठी उत्कृष्ठ कार्ये केले. त्यांची सुरूवात स्वत:च्या घरापासून करतांना यशोधरादेवी बजाज यांनी एक मुलगी वएक मुलगा दत्तक घेतला. त्यांना एक मुलगा दत्तक घेऊन स्वत:चा वंश पुढे चालवता आला असता परंतु मुलगा, मुलगी ह्यात कोणताही भेद न करणाऱ्या यशोधरादेवी यांनी मुलगी दत्तक घेऊन समाजापुढे एक आदर्श उभा केला.[११] महात्मा गांधीच्या पुण्यातिथि निमित्ताने त्यांनी ग्रामसफाई कार्याला सुरूवात दलित वस्तीपासुन केली. महाराष्ट्र शासनाने 'दलित मित्र' पुरस्कार १५ ऑगस्ट १९७१ ला देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.[१२] भारताचे माजी मा. राष्ट्रपती प्रतिभा देवी सिंह पाटील या यशोधरादेवी बजाज यांच्या बद्दल म्हणतात, 'समाज के दिन – दु:खी पिछडे वर्ग की प्रगती , महिलाओका विकास, बाल कल्याण ऐसें विधायक कार्य करते रहने की उनकी मंशा थी, तिव्र इच्छा, शक्ती थी, और उसे वह पूरी निष्ठा से निभाती थी । लोक सेवा के माध्यम से महाराष्ट्र की राजनीती में भी उन्होंने सफलता प्राप्त की । विधायक तथा मंत्री के रूप में कार्यकर यशोधराजी ने अपनी अलग पहचान बनाई ।[१३]

**शैक्षणिक कार्य :**

सर्वसामान्य आणि गरिब महिलांसाठी शिक्षणाचे दालन खुले करण्यात यशोधरादेवी यांचा मोठा वाटा आहे. महिलांसाठी नुतन विद्यालये, बालक मंदिरे, शाळा – महाविद्यालयांची निर्मिती केली. सर्वोदय महिला मंडळ, महिला गृह उद्योग, सहकारी संस्था, या संस्थेचे यशोधरादेवी अध्यक्षा होत्या. त्यांच्या ह्या कार्यामुळेच त्यांना वीरांगणा झलकारी बाई राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. [१४]

**निष्कर्ष :**

यशोधरादेवी बजाज एक महान स्त्री होत्या. प्रत्येक काळातच स्त्रिया ह्या संघर्ष करून पुढे आल्या आहेत. माहेश्वरी समाजात त्या काळात घुगंट पध्दत होती. त्यांच्यापुढे अनेक रूढींनी जोखडलेली बंधने होती. ज्या स्त्रियांना त्यांच्या काळात उंबरठाही ओलांडण्याची प्राज्ञा नव्हती त्या काळात यशोधरादेवींनी स्वत:च्या कर्तृत्वाचा सुवर्ण इतिहास लिहीला.

यशोधरादेवी पहिली महिला आमदार, पहिली महिला मंत्री म्हणुन चंद्रपूर जिल्हाने त्यांना गौरविले आहे. अनेक कार्यात त्यांचा पुढाकार असायचा. कठोर प्रशासक, श्रध्दावंत पण अंधश्रध्दा व प्रथांना झुगारून देणारे त्यांचे व्यक्तीमत्व चिरकाल ध्यानात राहणारे आहे.

**संदर्भग्रंथ सुची :**

१) पाठक दमयंती, वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान, मंगेश प्रकाशन नागपूर, २००३ पृ. २००
२) संपा. बजाज भरत, सुरेंद्र कौर, यशोगंधा, सचिव सर्वोदय महिला मंडळ, चंद्रपूर २०११ पृ. २२
३) कित्ता, पृ. ६१
४) कित्ता, पृ. ३३
५) कित्ता, पृ. ३४
६) कित्ता, पृ. २८
७) संपा. संचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, विधानसभा जनादेश, नागपूर–अमरावती विभाग, २००९ पृ. ९१
८) कित्ता, पृ. १७५
९) संपा. बजाज भरत, यशोगंधा, सुरेंद्र कौर, सचिव सर्वोय महिला मंडळ, चंद्रपूर, २०११ पृ. २५
१०) कित्ता, पृ. ७७
११) डॉ. अनुराधा सालफळे, मुलाखत – यशोधरादेवी बजाज यांच्या कन्या.
१२) संपा. बजाज भरत, यशोगंधा, सुरेंद्र कौर, सचिव सर्वोदय महिला मंडळ, चंद्रपूर, २०११ पृ. ४४
१३) कित्ता, पृ. १
१४) कित्ता, पृ. १४